अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# या निवडणुकीत लाटेचीच नुसती हवा

आपल्या देशातल्या राजकारण्यांना निवडून येण्यासाठी काही ना काही जुगार खेळावा लागतो. विशेषत: जे मोठे राजकीय पक्ष आहेत त्यांना स्वत:चे स्थान मजबूत करण्याकरता काही ना काही लाट निर्माण करावी लागते. परंतु आता मतदार किंवा अगदी सामान्य जनता पुरेशी जागरूक झालेली आहे. तिचा आता अशा लाटेवर विश्वास राहिलेला नाही. जिंकून येण्यासाठी वाटेल त्या कल्पना राबवून हवा निर्माण केली जाते. परंतु तो एक तात्पुरता जुगारच असतो. मतदान करताना कोणाला मत द्यायचे याचा तो पूर्वीपेक्षा जास्त विचार करू लागला आहे. जोपर्यंत स्वत:च्या मनाचे समाधान होत नाही. तोपर्यंत तो निर्णय देखील घेत नाही. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवसापर्यंत त्याच्या निर्णयामध्ये बदल होत असतो. त्याला सध्याचे राजकीय पक्ष आणि नेतेच कारणीभूत आहेत. कारण धंदेवाईक पध्दतीने राजकारण खेळले जाते. मोठमोठ्या एजन्सीजना कोट्यवधी रुपयांची प्रचारासाठी कंत्राटे दिली जातात. लोकांमध्ये स्वत:च्या पक्षाची किंवा नेत्याची चर्चा निर्माण करण्याचा सर्व प्रकाराने प्रयत्न केला जातो आणि यातला महत्त्वाचा भाग असा की, प्रचंड पैसा खर्च करून प्रचार होत असलेली व्यक्ती निवडून येईलच याची खात्री देता येत नाही. कारण त्या व्यक्तीविषयी अनेक प्रकारची उलटसुलट माहिती शेवटपर्यंत येत राहते. म्हणूनच भारताच्या लोकशाही पध्दतीत पक्षापेक्षाही लोक व्यक्तीला मतदान करतात आणि आता हा अनुभव जास्त पक्का झाल्यामुळे त्यांच्यावर लाटेबीटेचा काहीच परिणाम होत नाही. भारतीय जनता पार्टीतर्फे नरेंद्र मोदी यांची लाट निर्माण करण्याचा आटोकाट प्रयत्न होत आहे. परंतु मतदान करताना सामान्य माणूस त्याच्या मतदारसंघात कोण व्यक्ती उभी आहे याला जास्त महत्त्व देतो. मोदी कितीही लोकप्रिय असले तरी भाजपाचा तिकीट मिळालेला स्थानिक उमेदवार जर बदनाम किंवा छचोरगिरी करणारा असेल तर लोक त्याला मते देत नाहीत. अशावेळेला मोदी त्यांच्या जागेवर आणि स्थानिक उमेदवार त्याच्या जागेवर असा सरळसरळ भेद करून मतदान होते. यासाठीच निवडणुकांमध्ये लाटेचा नुसता गवगवा होतो. त्याचा पाहिजे तसा परिणाम दिसून येत नाही. तोच प्रकार काही प्रमाणात मोदी यांच्याबाबत घडून येऊ शकतो. या लाटेचा प्रत्यक्ष मतदानामध्ये वाटा किती हा प्रश्न कायमच राहणार आहे. रोज बदलणाऱ्या परिस्थितीत लाटेला महत्त्व राहीलच याची शाश्वती नाही. मतदारांना जसजशी नवीन नवीन माहिती मिळत जाते, अशा लाटेला वाटेला लावण्याचा प्रयत्न करत असतात.

### भाजपाची सावधानता

यंदाच्या लोकसभा निवडणुकीचे चित्र अजूनही स्पष्ट झालेले दिसत नाही. नरेंद्र मोदी यांना भारतीय जनता पार्टीने पंतप्रधान पदाचे उमेदवार म्हणून जाहीर केले. त्यांनी गुजरातमध्ये करून दाखवलेल्या कामाचा विचार केला गेला आणि आता देशाच्या विकासासाठीसुध्दा मोदी हे उपयुक्त ठरतील, असा विश्वास लोकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. गुजरातचा विकास वगैरे या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी राज्य पातळीवर केलेले कार्य देशपातळीवर जसेच्या तसे लाभ मिळवून देईल. असे समजण्याचे कारण नाही. अर्थात आतापर्यंत झालेल्या वेगवेगळ्या सर्वेक्षणामधून भारतीय जनता पार्टीला आघाडी मिळेल असे अंदाज व्यक्त झाले आहेत. जवळपास दोनशे सव्वा दोनशे जागा भारतीय जनता पार्टी जिंकेल, अशा प्रकारचा अंदाज व्यक्त झाला आहे. यामागे मोदी यांना पंतप्रधान पदाचे उमेदवार जाहीर केले. हे कारण असले तरी तेवढेच पुरेसेही नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. काँग्रेसने दाखवलेला नाकर्तेपणा महागाई, भ्रष्टाचार या सगळ्या गोष्टींचा लोक कंटाळले आहेत. लोकांना बदल हवा आहे आणि या बदलाचा फायदा भारतीय जनता पार्टीला मिळणार आहे तो मिळवण्याकरता आपला पक्ष तेवढाच सशक्त असल्याचे भाजपाला दाखवावे लागेल. ते करण्यात भाजपा यशस्वी झाला म्हणूनच वेगवेगळ्या सर्वेक्षणामध्ये भाजपाचे पारडे जड दिसू लागले. परंतु तुम्ही म्हणाल की, हा सगळा मोदी लाटेचा परिणाम आहे, तर ते तितकेसे योग्य ठरत नाही. तशी लाट असती तर याच सर्वेक्षणामधून भारतीय जनता पार्टीला पूर्ण बहुमत मिळू शकले असते. आजच्या परिस्थितीत देशात कोणत्याही पक्षाची लाट दिसत नाही हे मान्य करावे लागेल. काही वेळेला तर असाही प्रश्न निर्माण होतो की, लाटेचा प्रभाव असता तर भारतीय जनता पार्टीला आपल्या उमेदवाराची निवड करताना फारसा विचार करावा लागला नसता. हाच मुद्दा घेऊन काँग्रेस भाजपावर टीका करीत आहे आणि मोदी यांची लाट नाही असाच प्रचारही करत आहे.

### इंदिरा लाट, जनता लाट वगैरे

आतापर्यंत भारतामध्ये तीनच वेळा लोकसभा निवडणुकांमध्ये खऱ्या अर्थाने लाटेचा प्रभाव दिसून आला. इंदिरा गांधी यांनी स्वत:च्या ताकदीवर असे काही राजकीय वातावरण निर्माण केले होते की, काँग्रेस पक्षातून गाय वासरू हे चिन्ह आणि इंदिरा गांधी हे नाव या दोन्ही गोष्टी विचारात घेऊन लोकांनी मतदान केले होते. त्यावेळेला देशात इंदिरा लाट असल्याचे अगदी बोलले जात होते. त्यानंतर १९७७ मध्ये इंदिरा गांधींनी लादलेल्या आणीबाणीच्या विरोधात असंतोष निर्माण झाला आणि त्यावेळी स्थापन झालेल्या जनता पार्टीने स्वत:ची एक लाट निर्माण केली होती. तिसरा प्रकार इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर अशीच सहानुभूतीची लाट देशभरात पहायला मिळाली होती. नंतर मात्र अगदी राजीव गांधींच्या हत्येनंतरही अशा लाटेचा प्रभाव जाणवला नाही. इंदिरा लाट असताना कुठल्याही मतदारसंघात कोणीही व्यक्ती उभी राहिली तरी ती सहजपणे निवडून येत असे. जनता पार्टीच्या लाटेच्या वेळेला हाच अनुभव आला. लोक कोणती व्यक्ती उभी आहे याचा विचारच करत नव्हते. ती कोणत्या पक्षातर्फे उभी आहे. हे पाहूनच मतदान केले जात होते. महाराष्ट्रातसुध्दा अनेक ठिकाणी अशा लाटांच्या काळात अतिशय साधारण कार्यकर्ते सुध्दा प्रचंड मताधिक्याने निवडून आले होते. आज ती परिस्थिती दिसत नाही. भाजपाला उमेदवार उभे करतानाही दहा वेळा विचार करावा लागतो आहे त्याला लाट म्हणण्यापेक्षा स्वत:ची हवा निर्माण करण्याचा भाजपा प्रयत्न करत आहे.